**बातमीपत्र**

**पोलीस आयुक्तालय,सोलापूर शहर**

**माहिती कक्ष, दिनांक ०१ ऑक्टोंबर**

**सदरबाझार पोलीस ठाणे**

| | | |
|---|---|---|
| **गुरन. व कलम** | : | ५६८/२०१७भादविसक२७९,३३७,३३८,४२७,मोवाकाक,१८४,१७७,१३४ (अ) (ब),प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ ठिकाण** | : | २९/०९/१७ रोजी ०५.३० वा चे दरम्यान, डफरीन चौकातील मधोमध असलेल्या आयलंड येथे सोलापूर |
| **गु. दा. ता.वेळ** | : | ३०/०९/२०१७ रोजी १४.१७ वा. |
| **फिर्यादी** | : | भिमगोंडा रामगोंडा पाटील वय-३७ व्यवसाय-नोकरी रा.श्रघ्दाश्रय अपार्टमेंट ९४/२७०,ए/३ जोडभावी पेठ सोलापूर |
| **आरोपीचे नांव** | : | मो.सा.क्रं.एचएफ डिलक्स मो.सा.क्रं. एमएच-१३-बीवाय-५५११ चा चालक नाव पत्ता माहित नाही |
| **हकिकत** | : | यात हकीकत अशी की,बाजुस नमुद तारखेस ,वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी व फिर्यादीचा मेव्हणा नामे तेजल असे फिर्यादीची मोटार सा.क्रं.एमएच-१३-बीएम-०२६३,वरुन मेव्हण्यास रेल्वे स्टेशन येथे सोडण्यास जात असताना नमुद ठिकाणी एप्लॉयमेंट चौकाकडुन येणारी नमुद आरोपी चालकांची मो.सायकल ही नमुद आरोपीने आपल्या ताब्यातील मो.सायकल हि भरधाव वेगाने हयगयीने निष्काळजीपणाने व रहदारीच्या नियंत्रणाकडे दर्लक्ष करुन जोराने धडक दिल्याने फिर्यादी व फिर्यादीचे मेव्हणे हे मो.सायकलवरुन खाली पडल्याने फिर्यादीचे तोंडाचे जबडयाचे दोन्हीकडील हाड मोडले आहे तसेच उजव्या खांद्याचे ही हाड फॅक्चर झाले आहे व उजव्या पायाच्या नडगीवर किरकोळ दुखापत झाली असुन मेव्हणा तेजल यांचे डाव्या पायाचे नडगीचे हाड मोडुन दुखापत करणेस व फिर्यादीचे वाहनाचे अंदाजे ५,०००/-रु नुकसान करणेस व फिर्यादीवर औषधोपचार न करता व अपघाताची पोलीसांत खबर न देता निघुन गेला म्हणुन.तपासः- पोह/४२६/राठोड. |

# सदरबाझार  पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गुरन. व कलम** | : | ५६९/२०१७ भादविसक २६९,प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ ठिकाण** | : | ३०/०९/२०१७ रोजी चे ११.०० वा चे दाम्यान, नवनीत हॉस्पीटल रिमांड होम लगत सोलापूर |
| **गु. दा. ता.वेळ** | : | ३०/०९/२०१७ रोजी १७.५७ वा. |
| **फिर्यादी** | : | ईरण्णा गुरुपादाप्पा बिराजदार वय-५२ व्यवसाय-नोकरी ने.आरोग्य निरीक्षक सोमपा सोलापूर |
| **आरोपीचे नांव** | : | डॉ.नितीन शामसुंदर तोष्णीवाल व त्यांचे कर्मचारी |
| **हकिकत** | : | यात हकीकत अशी की,बाजुस नमुद तारखेस ,वेळी व ठिकाणी, यातील आरोपी मजकुर यांना लेखी समज पत्र देवून सुध्दा हॉस्पीटल मधील काम करणारे कर्मचारी यांनी सकाळी ११.०० वा.चे सुमारांस तेथहज कचरा पेटीची पाहणी केली असता सदर कचरा पेटीमध्ये आरोग्यास व जिवीतास धोकादायक असणारे इंजेक्शन,सलाईन बाटली,युरीन पाकिट, रक्तांचे पॅड असे घातक साहित्य आढळुन आले असुन डॉ तोष्णीवाल यांनी सदर कचरा हा बायोक्नीक सिस्टम प्रा. लि. यांच्या वाहनातुन तो शहराबाहेरील त्यांच्या केंद्रामध्ये नेवून नष्ट करणे गरजेचे असताना देखील हेतु पुरस्कर सदर दवाखान्यातील कर्मचारी नमुद घातक कचरा हा आरोग्यास धोकादायक आहे हे माहित असुन हि तो उघडयावर कचरा कुंडीत टाकलेला दिसुन आल्याने.तपासः-पोना/४५/गायकवाड |